कलन - ३

दस्त क्र. ०५८९ / २०२०

कल्याण डोंबिवली महानगरपालिका, कल्याण

जा.क्र.कडोंमपा/नरवि/बांप/कवि/२०१२-२३/१२२

कल्याण डोंबिवली महानगरपालिका, कल्याण

दिनांक :- ३०/०७/२०१२

(सुधारीत बांधकाम परवानगी.)

श्री./श्रीमती :- श्री.सी.के.गुप्ता व इतर

कुलमुखत्यारपत्रक :- मे.रिवान्नी निर्माण लि. तर्फे श्री.महेश खैरारी व इतर

वास्तुशिल्पकार:- श्री.अनिल निरगुडे, कल्याण (प.)

विषय:- मौजे-टिटवाळा, स.नं.२०१/१, २२३/१, २२५/१, २२४/१, २४६/१,
मौजे-मांडा स.नं.४२/१,२,३ व ४अ/१,.४अ/२,५,६, ४७/१, ५०/१अ,२,
२२०/१ येथे बांधकाम करण्याच्या मंजुरीबाबत.

संदर्भ:- १) आपला दि.२०/१०/२०१२ रोजीचा श्री.अनिल निरगुडे, कल्याण (प.) वास्तुशिल्पकार, यांचे मार्फत सादर केलेला अर्ज क्र.२६५४४
२) मंजुरी आदेश पत्र क्र.कडोंमपा/नरवि/बांप/कवि/२०१२-२३/१२२,दि.३०/७/२०१२

महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ४४ तसेच म.प्रा. व न.र. अधिनियम १९६६ चे कलम ४५ नुसार, मौजे-टिटवाळा, स.नं.२०१/१, २२३/१, २२५/१, २२४/१, २४६/१, मौजे-मांडा स.नं.४२/१,२,३ व ४अ/१, ४अ/२,५,६, ४७/१, ५०/१अ,२, २२०/१ मध्ये २६५४६८:०० चौ.मी. क्षेत्राच्या भुखंडाच्या विकास करावयास मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९चे कलम २५३ अन्वये बांधकाम करण्यासाठी केलेल्या दिनांक ०२/०७/२०१२ च्या अर्जास अनुसरून पुढील शर्तीस अधिन राहून तुमच्या मालकीच्या जागेत हिरव्या रंगाने दुरुस्ती दाखविल्याप्रमाणे तळघर, स्टील्ट, तळ मजला, पहिला मजला, दुसरा मजला, तिसरा मजला, चौथा मजला, पाचवा मजला, सहावा मजला, सातवा मजला, आठवा मजला, नववा मजला, दहावा मजला, अकरावा मजला,बारावा मजला (रहिवास) वाढेपर्यंतीच्या इमारतीच्या बांधकामाबाबत, बांधकाम प्रारंभ प्रमाणपत्र देण्यात येत आहे.इमारतीच्या व जागेच्या मालकी हक्कासंदर्भात कुठलाही वाद निर्माण झाल्यास त्याला सर्वस्वी आपण जबाबदार रहाल या अटीवर हे संमतीपत्र देण्यात येत आहे.

प्लॉट नं.३, इमारत क्र.१ ते ७ — स्टिल्ट + १२ मजले (रहिवास)
इमारत क्र.८ व ९ — स्टील्ट + १० मजले (रहिवास)
प्लॉट नं.२, इमारत क्र.१० ते २० — स्टील्ट + १२ मजले (रहिवास)
इमारत क्र.२१ व २८ — स्टील्ट + १४ मजले (रहिवास)
इमारत क्र.३१ व ३४ — स्टील्ट + ०१ मजला (रहिवास)
वाणिज्य- ०१ — तळ मजला.
वाणिज्य- ०२ — तळ + ०१ मजला.
क्लब हाऊस — तळ + ०१ मजला

सहाय्यक संचालक
नगर रचना कल्याण डोंबिवली महानगरपालिका

१) हे बांधकाम प्रारंभ प्रमाणपत्र दिल्याचे तारखेपासून एक वर्षापर्यंत वैध असेल, नंतर पुढील वर्षासाठी मंजुरीपत्राचे नुतनीकरण मुदत संपण्याआधी करणे आवश्यक आहे. नुतनीकरण करताना किंवा नवीन परवानगी घेताना त्यावेळी अस्तित्वात आलेल्या नियमांच्या व नियोजित विकास योजने अनुषंगाने छाननी करण्यात येईल.
२) नकाशात हिरव्या रंगाने केलेल्या दुरूस्त्या आपल्यावर बंधनकारक रहतील.
३) बांधकाम चालू करण्यापूर्वी सात दिवस आधी महापालिका कार्यालयास लेखी कळविण्यात यावे.
४)ही परवानगी आपल्या मालकीच्या कब्जातील जमीनीव्यतिरिक्त अन्य जमीनीवर बांधकाम अगर विकास करण्यास हक्क देत नाही
५) इमारतीचे बांधकाम या सोबतच्या मंजुर केलेल्या नकाशाप्रमाणे आणि घालून दिलेल्या अटीप्रमाणे करता येईल.
६) वाढेपर्यंत व जोत्याचे बांधकाम झाल्यानंतर वास्तुशिल्पकाराचे, मंजूर नकाशाप्रमाणे वाढी.तीचे व जोत्याचे बांधकाम केल्या-बाबतचे प्रमाणपत्र महानगरपालिकेस सादर करण्यात यावे; व ते या कार्यालयाकडून तपासून घेऊन "जोता पुर्णत्वाचा दाखला" घेण्यात यावा व त्यानंतरच पुढील बांधकाम करण्यात यावे.
७) सदर अभिन्यासात कोणत्याही प्रकारचा फेरफार पूर्व परवानगी घेतल्याशिवाय करू नये, तसे केल्याचे आढळून आल्यास सदरचे बांधकाम प्रारंभ प्रमाणपत्र रद्द झाले असे समजण्यात येईल.
८) इमारतीच्या बांधकामाच्या सुरक्षिततेची(स्ट्रक्चरल सेफटी)जबाबदारी सर्वस्वी आपले आर्किटेक्ट व स्थापत्य वि.तज्ञ यांचेवर राहिल
९) नकाशात दाखविलेल्या गाळ्यांच्या संख्येमध्ये व नियोजनामध्ये पूर्वपरवानगीशिवाय बदल करू नये.तसेच प्लॉटच्या हद्दीत इमारती भोवती मोकळ्या सोडावयाच्या जागेत बदल करू नये व त्यामध्ये कोणत्याही प्रकारचे बांधकाम करू नये.
१०) नागरी जमीन कमाल मर्यादा अधिनियम १९७६ मधील तरतुदी प्रमाणे जागा बाधित होत असल्यास त्याची जबाबदारी आपलेवर राहिल.
११) भूखंडाकडे जाण्या-येण्याच्या मार्गाची जबाबदारी संपूर्णपणे आपलेकडे राहिल.बांधकाम प्रारंभ प्रमाणपत्र निर्गमित ... दिले असल्यास त्या रस्त्याचे काम महानगरपालिकेच्या सोयी प्रमाणे व ...